# वाङ्मय मंडळ अहवाल (२०१७-१८)

*प्रा.श्रीमती के.व्ही.चव्हाण*
*वाङ्मय मंडळ प्रमुख*

विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळावा.विद्यार्थ्यांमध्ये वाङ्मयीन जाणिवा वृद्धिंगत व्हाव्या यासाठी वाङ्मय मंडळ नेहमीच उपक्रमशील असते.या उपक्रमांचा एक भाग म्हणून मंडळातर्फे वादविवाद,वक्तृत्त्व स्पर्धा,निबंध,काव्यवाचन,हस्ताक्षर इ.स्पर्धा घेतल्या जातात.स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व मार्गदर्शन केले जाते.विद्यार्थ्यांच्या लेखन गुणांचा विकास करणे,लेखन वाचनातून साहित्यिक अभिरुची घडवणे,चित्रपट व नाटक यांचा आस्वाद घेणे व परीक्षण करणे,यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शकांचे व्याख्याने आयोजित करणे या हेतूने मराठी-हिंदी-इंग्रजी विभागातर्फे महाविद्यालयात वाङ्मय मंडळ कार्यरत असते.अभ्यासक्रमावर आधरित चित्रपट,नाटके दाखविण्यासाठी मंडळा अंतर्गत ***इथिका क्लब*** आहे.तसेच विद्यार्थ्यांच्या मदतीने ***अक्षरगंगा*** ही भित्तीपत्रिका चालवली जाते.१४ सप्टे. हिंदी दिन,२७ फेब्रु.मराठी भाषा दिन साजरा केला जातो.

२०१७-१८ या शैक्षणिक वर्षात नासिक येथील कवी रवींद्र मालुंजकर यांच्या हस्ते वाङ्मय मंडळाचे उद्घाटन झाले.त्यावेळी त्यांनी कवितांचे सादरीकरण करीत काव्यनिर्मितीची प्रक्रिया व कवीचे योगदान या बद्दल मार्गदर्शन केले.

१४ सप्टे.हिंदी दिनानिमित्त निबंध,काव्यवाचन,दोहे स्पर्धा,अनुवाद,मुहावरे और कहावते या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.एल.आय.सी.चे अधिकारी सुबोध मिश्रा यांचे 'हिंदीचे महत्व'या विषयावर व्याख्यान झाले.

१५ ऑक्टोबर डॉ.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस निमित्ताने कवी अरुण ठोके व कवी कैलास सलादे यांचे व्याख्यान संपन्न झाले.

इथिका फिल्म क्लब तर्फे मालगुडी डेज(आर.के.नारायण),काबुलीवाला (रवींद्रनाथ टागोर),द सिंगल मन (चार्लस डीकेंन्स),ती फुलराणी (पु.ल.देशपांडे),गाईड (आर.के.नारायण) या फिल्म आणि ओंरगेन्स ऑफ स्पीच मकेनीझाम.बेसिक कम्युनिकेशन स्किल्स ,दि शिकागो स्पीच हे व्हिडिओ दाखविण्यात आल्या.

**१ जाने.ते १५ जाने २०१८-** हा कालावधी **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'**म्हणून महाविद्यालयात साजरा करण्यात आला.या निमित्ताने महाविद्यालयात विविध

ARTS,SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी विद्यार्थाची सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा घेतली.त्या स्पर्धेत ८३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.या पंधरवडाचा समारोप कवी प्रशांत केंदळे यांचे व्याख्यान झाले.

मराठी,हिंदी व इंग्रजी विभागातील प्रा.कैलास सलादे,डॉ.दीपा कुचेकर ,प्रा.मनीषा चिने,प्रा.जयश्री पवार,प्रा.आर.बी.शिंदे, ,प्रा.योगेश मोहन,प्रा.शशिकांत पाटील या सर्वांचे सहकार्य लाभले.

वाङ्मय मंडळाच्या उपक्रमासाठी मा.प्राचार्य डॉ.संभाजी पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.धन्यवाद

Chavan
(प्रा.श्रीमती चव्हाण के.के.
वाङ्मय मंडळ प्रमुख

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE
OZAR (MIG) 275219

प्राचार्य
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्या
ओझर(मिग),ता.निफाड,जि.नाशि